# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.08.2025** **वारःशुक्रवार**

---

- कोणत्याही अण्वस्त्र धमक्यांना भारत भीक घालणार नाही – स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सज्जड इशारा
- समृद्ध भारताच्या उभारणीसाठी 140 कोटी भारतीयांनी योगदान द्यावं – पंतप्रधानांचं आवाहान
- पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेची पंतप्रधानांची महत्त्वपूर्ण घोषणा
- अमृत काळात युवावर्ग, महिलाशक्ती आणि मुख्य प्रवाहाच्या बाहेरचे समाज घटक देशाला आघाडीवर ठेवतील; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा विश्वास
- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यातली बहुप्रतीक्षित बैठक आज अलास्कामध्ये आणि
- इस्राईलमधील जेरूसलेम ग्रँडस्लॅम ॲथलेटीक्समध्ये भारताच्या अंकीता ध्यानीला सुवर्ण पदक

**<u>पंतप्रधान</u>**

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताच्या सैन्य दलांनी शत्रूला त्यांच्या कल्पनेपेक्षाही जास्त कठोर प्रत्युत्तर दिलं आहे, भारत यापुढे कोणत्याही अण्वस्त्र धमक्यांना भीक घालणार नाही असा सज्जड इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिला. एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनी दिल्लीत ऐतिहासिक लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवल्यानंतर, लाल किल्ल्याच्या तटावरून त्यांनी देशवासियांना संबोधित केलं.

ऑपरेशन सिंदूरच्या यशात सहभागी शूर वीरांना त्यांनी सलाम केला. दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये केलेल्या भ्याड हल्ल्यामुळे संपूर्ण देशात आक्रोशाची भावना होती; ऑपरेशन सिंदूर ही देशवासीयांच्या याच आक्रोशाची अभिव्यक्ती आहे असं पंतप्रधान म्हणाले. सिंधू जल करार भारतासाठी अन्यायकारक होता; असं सांगून रक्त आणि पाणी एकाच वेळी वाहणार नाही असा परखड इशारा पंतप्रधानांनी दिला.

आत्मनिर्भरता हे विकसित भारताचं सामर्थ्य आहे, 21वं शतक हे तंत्रज्ञानाचं शतक आहे असं सांगून विकसित भारताच्या उभारणीसाठी देशातल्या युवा पिढीनं योगदान देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आपल्या आधीच्या पिढ्यांनी स्वतंत्र भारतासाठी आपल्या प्राणांचं बलिदान दिलं, आता 140 कोटी भारतीयांनी समृद्ध भारताच्या उभारणीसाठी कार्यरत व्हावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

पचहत्तर सौ साल पहले का वो कालखंड याद कीजिए पूरा देश स्वतंत्र भारत के मंत्र को लेकर के जीता था।
आज समय की मांग है। स्वतंत्र भारत का मंत्र लेकर के जीने वालों ने हमें स्वतंत्र भारत दिया
आज एक सौ चालीस करोड़ देशवासियों का एक ही मंत्र होना चाहिए समृद्ध भारत।
अगर कोटी कोटी लोगों के बलिदान से स्वतंत्र भारत हो सकता है तो कोटी कोटी लोगों के संकल्प से पुरुषार्थ से आत्मनिर्भर बनने से वोकल फोर लोकल की बात करने से स्वदेशी का मंत्र को जापने से। समृद्ध भारत भी बन सकता है।
वो पीढ़ी स्वतंत्र भारत के लिए खप गई थी। ये पीढ़ी समृद्ध भारत के लिए नए कदम उठाए यही समय की मांग है।

अणु उर्जेच्या क्षेत्रात भारतानं मोठी प्रगती केली आहे. हवामान बदलाच्या आव्हानामुळे संपूर्ण जग चिंतीत आहे, भारतानं 2030 पर्यंत पन्नास टक्के स्वच्छ उर्जा निर्मितीचं उद्दिष ठेवलं होतं, हे उद्दिष्ट भारतानं पाच वर्ष आधीच पूर्ण केलं असं पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेची महत्त्वपूर्ण घोषणा पंतप्रधानांनी आजच्या स्वातंत्र्यदिनी केली. सुमारे 1 लाख कोटी रुपयांची तरतूद असलेली ही योजना देशभरात आजपासून लागू होईल. या अंतर्गत खाजगी क्षेत्रात पहिली नोकरी मिळवणाऱ्यांना सरकारकडून 15, हजार रुपये मिळतील असं पंतप्रधानांनी सांगितलं.
वस्तू आणि सेवा कर प्रणालीमध्ये सुधारणा केली जाईल, तसंच या दिवाळीला देशवासियांना एक मोठी भेट मिळणार असल्याचं मोदी यांनी सांगितलं.
शेतकऱ्यांच्या पशुपालकांच्या मच्छीमारांच्या हिताला तसंच वंचित वर्गाच्या हिताला सरकारचं प्राधान्य आहे, असं पंतप्रधान म्हणाले.
व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माणाचं कार्य करणाऱ्या आणि सेवा समर्पण आणि संघटन या संकल्पनेनुसार कार्यरत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला या वर्षी शंभर वर्ष पूर्ण होत आहेत, त्या निमित्तान संघाच्या कार्याला त्यांनी वंदन केलं.
जन्माष्टमीच्या निमित्तानं सुदर्शन चक्र मोहिमेची घोषणा त्यांनी केली. येत्या 2035 पर्यंत सार्वजनिक ठिकाणांना सुरक्षा कवच प्रदान करण्यासाठीची ही मोहीम आहे.
आपल्या समृद्ध परंपरेचा अभिमान, आत्मनिर्भरता, गुलामगिरीच्या मानसिकता सोडून स्वदेशीचा स्वीकार ही मूल्य प्रत्येकानं अंगीकारावीत, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>राष्ट्रपती</u>**

2047 पर्यंत विकसित अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीनं भारताची वेगानं वाटचाल सुरू आहे, देशाच्या या अमृत काळात युवावर्ग, महिलाशक्ती आणि दीर्घकाळ मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहिलेले समाज घटक देशाला आघाडीवर ठेवतील असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला काल राष्ट्रपतींनी देशवासियांना संबोधित केलं.
पहलगाम दहशतवादी हल्ला ही भ्याड आणि अमानवी कृती होती, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सशस्त्र दलांनी त्याला अत्यंत निर्णायक पद्धतीने आणि दृढनिश्चयाने प्रत्युत्तर दिलं,
दहशतवादाविरुद्ध मानवतेच्या लढाईतलं एक उदाहरण म्हणून ऑपरेशन सिंदूरची इतिहासात नोंद होईल असं राष्ट्रपती म्हणाल्या.
अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शहरांमध्ये पायाभूत सुविधांची उभारणी, डिजिटल व्यवहारांचा वाढता वेग, यासह समाजातील विविध घटकांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपल्या सगळ्यांनाच स्वतःमध्ये बदल करावे लागतील असं सांगून पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं.

**ट्रंप पुतीन**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यातली बहुप्रतीक्षित बैठक आज अलास्कामध्ये एंकोरेज इथल्या अमेरिकेच्या संयुक्त लष्करी तळावर होणार आहे. यावर्षी जानेवारीमध्ये ट्रंप यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर दोन्ही नेत्यांमधली ही पहिलीच बैठक असेल.
युक्रेनबरोबरच युद्ध थांबवण्यासाठी राष्ट्राध्यक्ष पुतीन तयार आहेत; मात्र दोन्ही देशांतला तणाव निवळण्यासाठी यूक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर आणखी एकदा चर्चा करावी लागेल असं ट्रंप यांनी म्हटलं आहे. दरम्यान ट्रम्प यांच्या बरोबरच्या बैठकीपूर्वी राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी काल क्रेमलिनमध्ये एक बैठक घेतली. रशिया आणि अमेरिकेदरम्यान अण्वस्त्र नियंत्रण विषयक करार होण्याची शक्यता असून रशिया आणि युक्रेनबरोबरच संपूर्ण युरोपमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी अशा प्रकारचा करार आवश्यक असल्याचं पुतिन यांनी म्हटलं आहे. युक्रेन बरोबरचं युद्ध संपवण्यास पुतीन सहमत झाले नाहीत तर रशियाला गंभीर परिणाम भोगावे लागतील , असा धमकीवजा इशारा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी याधीच दिला होता. दोन्ही नेत्यांमधली ही बैठक सकारात्मक झाली तर या बैठकीनंतर युक्रेनचे वॉलोदीमिर झेलेनस्कि यांच्यासमवेत त्रिपक्षीय बैठक करणार असल्याचंही ट्रंप यांनी म्हटलं आहे.

**गोकुळाष्टमी**

जन्माष्टमीचा सण आज देशभरात सर्वत्र साजरा होईल; त्यानंतर उद्या प्रामुख्यानं महाराष्ट्रात सर्वत्र दहीहंडी उत्सवाचा थरार पाहायला मिळणार आहे.

**नवरोझ**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी जनतेला पारशी नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नवरोज हा नूतन वर्षाचा पहिला दिवस उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती या त्रिसूत्रीचं स्मरण देतो. असं राज्यपालांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**शौर्यपुरस्कार**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिन्ही सैन्य दलं आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांना 127 शौर्य पुरस्कार जाहीर केले; तसंच 290 जणांचा विशेष गौरव केला आहे. यात 4 किर्ती चक्रं, 15 वीर चक्रं, 16 शौर्य चक्रं, 60 सेना पदकं, 6 नौसेना पदकं, 26 वायू सेना पदकं, 7 सर्वोत्तम युद्ध सेवा पदकं, 9 उत्तम युद्ध सेवा पदकं आणि 24 युद्ध सेवा पदकांचा समावेश आहे.

**ॲथलेटीक्स सुवर्ण**

ॲथलेटीक्समध्ये भारताच्या अंकीता ध्यानीनं इस्त्राईलमध्ये झालेल्या जेरूसलेम ग्रँडस्लॅम 2025 स्पर्धेत महिलांच्या 2 हजार मीटर स्टीपलचेस शर्यतीत विजय मिळवत सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं आहे. या

विजायासह तिनं या स्पर्धेत आशियाई क्रीडा सुवर्णपदक विजेती पारुल चौधरी चा राष्ट्रीय विक्रम मोडला. अंकितानं 6 मिनिटं 13 पुरणक 92 सेकंद वेळ नोंदवत हे अव्वल स्थान पटकावलं. या स्पर्धेत इस्त्राईलची अद्वा कोहेन दुसऱ्या तर डेन्मार्कची ज्यूलियन ह्विद तिसऱ्या स्थानावर आहेत. अंकिताच्या या विजयाचा फायदा तिला 13 ते 21 सप्टेंबर दरम्यान जपानमध्ये होणाऱ्या आगामी जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपदासाठीच्या स्पर्धेत होणार आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**